स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय
अलिबाग सा. बां. विभाग, अलिबाग
पिन कोड - ४०२२०१

दुरध्वनी क्रमांक - (०२१४१)२२२०८४
Email : alibag.ee@mahapwd.gov.in
फॅक्स नंबर (०२१४१)२२५०९६

जा.क्र.अवि/रेचीशा/ १६०८/२०२३
दिनांक:- २८/०३/२०२३

E. E.
A.O.
A.A.M.
SECTION
IFMS B03960
Date 24/03/2023

प्रति,

**कार्यकारी अभियंता,**
**मऔविम, विभाग, अलिबाग.**

**विषय** : पोयनाड उसर भादने, नागाव, बेलकडे रा.मा.साखळी क्र. १/७०० ते ४/५०० दरम्यान रस्त्यालगत पाण्याच्या पाईप लाईन टाकण्याची परवानगी मिळणेबाबत.

**संदर्भ** : १. आपले कार्यालयीन पत्र जा. क्र./का.अ./C३८९१०/सन २०२२ दि.१४.०७.२०२२
२. उपविभागीय अधिकारी, सा. बां. उपविभाग, क्र.१ अलिबाग यांचे पत्र जा.क्र./ अउपवि १/९८५/२०२२ दि. ३०.११.२०२२
३. आपले कार्यालयीन पत्र जा. क्र./का.अ.A९१३०६/सन २०२३ दि.१४.०३.२०२२

वरील विषयान्वये संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये आपण पोयनाड उसर भादने, नागाव, बेलकडे रा.मा ९० साखळी क्र. १/७०० ते ४/५०० दरम्यान रस्त्यालगत पाण्याच्या पाईप लाईन टाकण्याची परवानगी मिळणेबाबत या कार्यालयाकडे विनंती केली आहे. त्याअुनषंगाने संदर्भ क्र.२ अन्वये उपविभागीय अधिकारी, सा. बां. उपविभाग, क्र.१ अलिबाग यांनी विषयांकीत अहवाल व पाण्याच्या पाईप लाईन टाकण्याकरीता आवश्यक भूभाडे आकारणी करून या कार्यालयास सादर करण्यात आले आहे. त्यानुसार संदर्भ क्र.३ नुसार रस्ता पूर्ववत करणेकरीता रू. ७,७०,०००/- व पाच वर्षाचे भूभाडे रू. ३,८५,५४७/- असे एकूण ११,५५,५४७/- (अक्षरी रू. आकरा लक्ष पंचावन हजार पाचशे सत्तेचाळी मात्र) इतक्या रक्कमेचा धानाकर्ष क्र. ७७७७२५, दि. १७.०२.२०२३ नुसार तसेच कॅनरा बँक मरोळ, मुंबई शाखेची १,०५,०००/- ची बँक गॅरंटी क्र.TOPGOPG२३०६८००३६ दि. १०.०३.२०२३ नुसार या कार्यालयाकडे जाम करण्यात आले आहे. तरी वरील रस्त्यालगत खोदाई करून पाण्याची पाईप लाईन टाकण्याबाबतच्या प्रस्तावास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानागी देण्यात येत आहे.

**<u>अटी व शर्ती :</u>**

१) सदर पाण्याची पाईपलाईन ही रस्त्याच्या पृष्ठ भागापासून १.५ मीटर खोलीवर टाकण्यात यावी. (राष्ट्रीय महामार्ग परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्र.एनएच-३/पी/६६/७६ दि.१९.११.१९७६ चे अनुपालन करावे.)

२) रस्त्याच्या कडेला जलवाहिनी टकण्यापूर्वी त्याच्यापेक्षा मोठया व्यासाचा कॉंक्रीट अगर आवश्यक वाटल्यास स्टिल एनकेसिंग पाईप टाकण्यात यावा व सदर चर मोठया अगर लहान खडीनेच भरण्यांत यावा. त्यात मातीचा वापर करण्यात येवू नये.

३) परवानगी प्राप्त झाल्यनंतर अर्जदारानी रस्ता खेदून पाईप लाईन टाकताना वहातूकीस कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही याची पूर्ण दक्षता घ्यावी. काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदाराची राहील.

४) रस्त्याला छेदून जलवाहिनी टाकताना रहदारी विषयक सोय व सुरक्षा यांची योग्य ती काळजी घेऊन, रस्त्याच्या रुंदीच्या अर्ध्या भागात खोदकाम करण्यात येईल, रस्त्याच्या दुसरा अर्धा भाग खोदण्यात येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

५) अर्जदाराच्या मालमत्तेचे हानीपासून संरक्षण करण्याची शासन हमी देत नाही.

६) कराराती‍ल अटी व शर्तीचे पालन न केल्यास टाकण्यात आलेल्या जलवाहिनी काढून टाकण्यात येईल आणि यासाठी करण्यात आलेला खर्चास संबंधित अर्जदार जबाबदार असेल.

७) या परवानगीच्या प्रस्तावामध्ये काही फेर बदल झाल्यास या विभागाची फेर मंजूरी घेऊनच काम सुरू करण्यांत यावे.

८) कामास सुरवात करण्यापूर्वी कामाच्या ठिकाणापासून १०० मीटर अंतरावर सावधानतेच्या इशाऱ्याचे फलक रिफलेक्टीव स्ट्रीपचा वार करावा. तसेच रात्रिच्या वेळी काम सुरु अथवा अपूर्ण राहिल्यास माहितगार तंत्रज्ञासह रात्रभर राहणारा लाल प्रकाश झोताचा दिवा लावण्यात यावा.

९) सदर जलवाहिनीची काही दुरुस्ती करावयाची असल्यास या विभागाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील

१०) काम सुरु करण्यापूर्वी आवश्यक तो करारनामा रु. १००/- च्या बाँड पेपरवर कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, अलिबाग यांच्याशी करार करणे आवश्यक आहे. सदर करारनाम्याचे ५ वर्षा नंतर नुतनीकरण करणे बंधनकारक असून ५ वर्षा नंतरचे वापरण्यात येणाऱ्या जागेचे भाडे आगाऊ भरणे बंधनकारक राहील.

११) पाण्याच्या पाईप लाईनमधून पाण्याची गळती झाल्यास व त्यामुळे रस्ता खराब झाल्यास त्यास अर्जदार जबाबदार राहिल व त्यानुसार रस्त्याची आवश्यक दुरुस्ती करून देणे अर्जदारवर बंधनकारक राहील.

१२) रस्ता रुंदीकरण अथवा कामासाठी सदरील जागा हवी असल्यास टाकण्यात आलेली पाण्याची पाईप लाईन अर्जदाराने विनाविलंब विनाशर्त स्वखर्चाने काढणे बंधनकारक राहील.

**सोबत:** वरीलप्रमाणे

**(ज. ई. सुखदेवे)**
**कार्यकारी अभियंता,**
**अलिबाग सा.बां.विभाग, अलिबाग**

**प्रत :** उपविभागीय अधिकारी, सा. बां. उपविभाग क्र.१, अलिबाग यांना माहितीसाठी व पूढील कार्यवाहीसाठी रवाना.